■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८६ ■ शुक्रवार दि.४ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 286 ■ Friday Dt.4 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शिक्षण विभागाच्या पाचशे कोटींच्या दुधात फुलारी नागनाथने लक्ष्मण बेडसकरच्या चमच्याने दूध पिलं?

## फुलारीच्या लक्ष्मणने शिक्षण क्षेत्रातल्या पाचशे कोटींच्या घोटाळ्याचे नियोजनबद्ध कार्यक्रम केला; पाचशे कोटींचा घोटाळाप्रकरणी शिक्षण मंत्री दादा भुसेंची एसआयटीची घोषणा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# सईद खान नेमका कोण आहे शिक्षण क्षेत्रातला मराठवाड्यातील शिक्षण विभागाला कोट्यावधी रुपयांचे व्यवहार करणारा तो सईद खान कोण?

## सादेक इनामदारचा बंदुकीचा परवाना रद्द केला परंतु एसआयटीकडे आता इनामदारच्या प्रश्नांचे उत्तर फुलारी, शिंदे, राऊत, बेडसकर, हजारे देतील का अशी चर्चा रंगू लागल्या?

### सईद खान छत्रपती संभाजीनगर चा मोठा दलाल नेमका लक्ष्मण बेडसकरच्या संपर्कात आहे का नाही हे फोन कॉल डिटेल तपासल्यानंतर लक्षात येईल?

## चंपावती, राजस्थानी एसआयटी चौकशीच्या रडारवर?

## भगवान फुलारी, नागनाथ शिंदे, राऊत भेंडेकर हजारे यांनी चंपावती आणि राजस्थानीबद्दल स्पष्टीकरण द्यावं?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात शिक्षण विभागात ५०० कोटी रुपयांचा घोटाळा चव्हाट्यावर आहे. याबाबत शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी एसआयटी चौकशी स्थापन केली आहे. यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. तसेच ५०० कोटींच्या शिक्षण भरती घोटाळ्याच्या सर्व सूत्रांची आणि जिम्मेदारीचे काम हे बेडस्कर नावाच्या केजच्या विद्यमान शिक्षण अधिकाऱ्याने जिम्मेदारीने काम पार पाडले आणि वेगवेगळ्या पत्रकारांना आणि संस्था चालकांना आर्थिक देवाण-घेवाण मध्ये बेडसकर नावाचा लक्ष्मण आज भ्रष्टाचाराने बरबटल्यानंतर आज सुद्धा तो बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या थाटात फिरतो लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्यावरती कारवाई केल्यानंतर सुद्धा तो लक्ष्मण आता नेमकं ५०० कोटींच्या घोटाळा प्रकरण कशा पद्धतीने दाबतो हे आता जनतेसमोर येणार आहे. लक्ष्मण बेडसकर या














शिक्षण क्षेत्रातल्या एका बाणाने अनेक पक्षी मारले असं म्हणायला हरकत नाही. लक्ष्मण बेडसकरचा बाण हा गटशिक्षणाधिकारी फुलारीच्या इशाऱ्यावर चालतो. फुलारी हा लक्ष्मण बेडसकर यांच्या आर्थिक देवाणघेवाणीतील भगवान मानला जातो. तसेच अजिंठा तालुक्यातील सईद खान हा सहशिक्षक जिल्ह्यातील सर्व शिक्षणाधिकारी व उपसंचालक औरंगाबाद शिक्षण विभाग यांचे टीईटी घोटाळ्यातील पैसे व शिक्षक भरती घोटाळ्यातील पैसे गोळा करण्याचे काम करतो. यांचे व सर्व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे तसेच बेडसकर व इतर कर्मचाऱ्यांचे कॉल डिटेल तपासणी करण्यात यावी अशी मागणी होत आहे. शिवाय नागरे नावाचा पत्रकार हा नेमका कुणाचा कोणत्या वादग्रस्त संपादकाचा हे सर्वांना माहिती आहे. परंतु नागरेला आणि फुलाऱ्याला आणि त्यानंतर अनेकांना ढासण्याचे काम नागरेकडून झालेला आहे. नागरे हा पत्रकार आहे. नागरे हा एक ९० चा पॅक एखाद्या बियर बार मध्ये जर पिला

पान २ वर

### पत्रकारांचे संस्था चालकांसोबत लागेबांधे असल्याची चर्चा?

बीड जिल्ह्यातील अनेक पत्रकारांच्या बायका, बहिणी, भाऊ, भावजया असे अनेक नातेवाईक ५०० कोटीच्या भ्रष्टाचारात शिक्षण विभागामध्ये दबाव तंत्राचा वापर करत, पत्रकार संपादक यांनी संस्था हडप केल्या. संस्थाचालकांना, शिक्षकांना आणि शिक्षणाधिकाऱ्यांना दबाव आणत अनेक पत्रकारांनी स्वतःच्या घरातील नातेवाईक हे शिक्षण विभागांमध्ये वेगवेगळ्या संस्थेवर नोकरीला लावले. ५०० कोटींच्या घोटाळ्यामध्ये अनेक पत्रकारांचे संस्था चालकांसोबत लागेबांधे असल्याची चर्चा शिक्षण विभागातील जिल्हा परिषद परिसरामध्ये ऐकायला मिळत आहे?

### जिल्हा प्रशासनाने कोणाच्या दबावाखाली शस्त्र परवाना रद्द केला?

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, जर एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यांनी भ्रष्टाचार बाहेर काढला आणि तो पण ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार काढला तर इंजिनिअर सादिक इनामदार हा नेमका कसा आहे हे तपासणी गरजेचे आहे. आपण सादिक इनामदार च्या बंदुकीचा परवाना रद्द केला खरा परंतु सादिक इनामदार यांच्यावर नेमक्या किती केसेस आहेत हे तपासणे गरजेचे आहे. सादिक इनामदार हा गुंड प्रवृत्तीचा आहे का? गुंड आहे का? याची खात्रीशीर चौकशी करणे गरजेचे आहे. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये पाहता आपण सादिक इनामदार चा परवाना रद्द केला परंतु आचारसंहितेच्या काळात सुद्धा सादिक इनामदार या व्यक्तीचा परवाना रद्द करण्यात आला नव्हता. कमीत कमी तो दाखला बघून तरी आपण सादिक इनामदार च्या बंदुकीचा परवाना रद्द करू नये, कारण तत्कालीन जिल्हाधिकारी व तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी सुरक्षेच्या कारणास्तव विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आचारसंहितेमध्ये सूट देण्याचा निर्णय समितीने घेतला असता आत्ताचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना शस्त्र परवाना रद्द करण्याचा दबाव कोणाचा आला आहे?

### लक्ष्मण बेडसकर हा मोरक्या शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक?

बीड जिल्ह्यातील ५०० कोटींच्या शिक्षण विभागाच्या घोटाळ्यांमध्ये नागनाथ शिंदे, भगवान फुलारी यांच्यानंतर आता सर्वात महत्त्वाचं नाव म्हणजे लक्ष्मण बेडसकर हे पुढे येत आहे. लक्ष्मण हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा गुन्हा दाखल झालेला अधिकारी आहे. शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक आहे. असे समजायचं का मनात कर्मचारी यांची थट्टा मस्करी चालू. लक्ष्मण बेडसकर वर कोणत्या पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. व किती रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने पकडलेले आहे? हे पुढील अंकात समोर येणार आहे.

### एका शिक्षकामागे किती व्यवहार झाला याचीच सखोल चौकशी करा?

बीड शहरातील नामांकित असलेल्या बीड मधील चंपावती आणि राजस्थानी या शाळेतील एकूण किती शिक्षक पद भरती झालेली आहे. हे जनतेला माहित आहे का? एका शिक्षकामागे किती व्यवहार झालेला आहे हे माहिती आहे का? एकूण या शाळेमध्ये आजपर्यंत काय झाले कधी झाले कुठे झाले कसे झाले आणि फुलारी, नागनाथ शिंदे, लक्ष्मण बेडसकर, राऊत, भेंडेकर, हजारे या सर्वांचे आशीर्वादाने नेमकं कुठं कुठं कसं घडलं हे आता जनतेला एसआयटी चौकशीच्या माध्यमातून माहिती होईलच कारण सर्वात पहिल्यांदा जर कोणाची चौकशी झाली तर ती चंपावती आणि राजस्थानी ची होणे गरजेचे आहे. अशी चर्चा शिक्षण विभागातील व बीड शहरातील नागरिकांमध्ये तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये रंगू लागली आहे?

### बेकायदेशीर नियुक्ती तात्काळ शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तत्काळ स्थगिती द्यावी?

अधिवास विभाग अमरावती येथे बदली झालेले शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांची शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे स्विय्य सहाय्यक यांच्याकडे ६० लक्ष रुपये देऊन लातूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी अंशतः बद्दल करून नियुक्ती केली. नागनाथ शिंदे यांना बीड शिक्षक भरती घोटाळ्यांमध्ये वादग्रस्त असताना सुद्धा त्यांनी अमरावती आदिवासी विभाग येथे झालेली बदली रद्द करावी यासाठी खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. असे असताना सुद्धा त्यांची लातूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी केलेली बेकायदेशीर नियुक्ती तात्काळ शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तात्काळ स्थगिती द्यावी नाहीतर याचे पडसाद अधिवेशनात पडतील?

### ..नसता जिल्ह्यातील सामाजिक संघटना संपूर्ण बीड जिल्हा बंदची हाक पुकारणार?

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी इंजिनीयर सादिक इनामदार सारख्या सच्चा समाजसेवक व भ्रष्टाचार विरोधी लढणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या वरती खोटे गुन्हे दाखल करून तुम्हाला काय मिळणार? जिल्हा तुमच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहणार, दाखल केलेले खोटे गुन्हे परत घेण्यात यावे यासाठी संपूर्ण बीड जिल्हाभर निवेदन देण्यात येत आहे व आंदोलन करण्यात आले. जर असे खोटे गुन्हे यापुढे दाखल केले तर बीड जिल्ह्यातील सामाजिक संघटना संपूर्ण बीड जिल्हा बंदची हाक पुकारणार आहे?

## पिंपळनेरचे एपीआय मधुसुदन घुगेची दबंग कारवाई
## दारू माफियाच्या विरोधात कारवायाचा धडाका सुरूच

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर पोलीस ठाण्याची कारवाई मोठ्या प्रमाणात देशी दारू जप्त केली. दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी पोलीस स्टेशन पिंपळनेर हद्दीत मोठ्या प्रमाणावर देशी दारूची चोरटी वाहतूक उघडकीस आली. पोलीस उपनिरीक्षक गोलवाल यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे चिंचोली गावाजवळ नाळवंडी ते बीड रोडवर स्विफ्ट वाहनातून बेकायदेशीर देशी दारूची वाहतूक केली जात असल्याचे समजले. सदर माहितीच्या आधारे सपोनि मधुसुदन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पार्टीने पंचासमक्ष छापा टाकून खालीलप्रमाणे कारवाई केली.

पान २ वर




## बीडमध्ये 'सीट्रिपल आयटी'ला जागेसह निधी देण्याचा निर्णय
### अजितदादांमुळे बीड जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल : डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या पुढाकारामुळे या महत्त्वाकांक्षी 'सीट्रिपलआयटी' (सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँण्ड ट्रेनिंग) या प्रकल्पाच्या उभारणीस गती मिळाली आहे. प्रकल्पासाठी ४ हजार चौ.मी. जागा मंजूर केली असून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आहे. अजितदादांमुळे जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. बीडमध्ये सीट्रिपलआयटी प्रकल्पासाठी ४,००० चौ. मी. जागा मंजूर करण्यात आली आहे. एमआयडीसीकडून जागा देण्यासाठी आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा १९१ कोटींचा प्रकल्प असून, टाटा टेक्नॉलॉजीकडून पुढाकार घेण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७,००० युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार

पान २ वर





# वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत कोसळली

## भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली : डॉ.गणेश ढवळे





पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत कोसळली. भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली. त्यामुळे तिसरी वर्गातील मुलांचा वर्ग आज झाडाखाली भरविण्यात आला होता. गेल्या ४-५ वर्षांपासून सातत्याने शिक्षण विभागाला पाठपुरावा करूनही शाळेच्या नविन बांधकाम ईमारतीसाठी निधीची तरतूद न केल्याने सरपंच अतुल मकाळ यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. पालक घडलेल्या घटनेमुळे भयभीत झाले असुन मुलांना शाळेत पाठवावे की नाही या चिंतेत आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडच्या विमानतळासाठी निधी देऊन चिंता करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा द्याव्यात अशी उद्विग्न प्रतिक्रिया दिली.

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा १९५३ सालची असुन १ ते ७ वी पर्यंत वर्ग असुन एकुण पटसंख्या १३० आहे. एकुण ८ वर्गखोल्या पैकी ६ धोकादायक स्थितीत आहेत. कार्यालयाच्या छताचे पोपडे पडत आहेत. काल दि.३ गुरुवार रोजी मध्यरात्री ३ वर्ग अध्यापन सुरू असलेल्या वर्गाची भिंत कोसळली. रात्री भिंत कोसळल्याने दुर्घटना टळली. दिवसा भिंत कोसळली असती तर गंभीर घटना घटली असती. विस्तार अधिकारी गटशिक्षण विभाग पंचायत समिती पाटोदा हनुमान गव्हाणे यांनी शाळेला भेट दिली.

**शिक्षण विभागाचे वारंवार पाठपुरावा करूनही दुर्लक्ष ; मुलांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार दुर्दैवी**

१९५३ सालची शाळा असल्याने शाळेच्या ईमारतीची दुरावस्था झालेली आहे. शाळेच्या कार्यालयाच्या छताचे पोपडे कोसळुन लोखंडी गज ऊघडे पडलेले आहेत.४-५ वर्षांपासून वारंवार शिक्षण विभागाकडे शाळेच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा म्हणून पाठपुरावा केला आहे मात्र शासन आणि प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नाही. सध्या तिसरीचा वर्ग झाडाखाली भरविण्यात आला असुन एक दोन दिवसात ग्रामपंचायत कार्यालयात त्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. हा मुलांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी असल्याचे वैद्यकिन्हीचे सरपंच अतुल मकाळ यांनी सांगितले.

**मुलांची काळजी वाटते; सरकारच्या दुर्लक्षामुळे पालक खाजगी शाळेकडे पालकांचा ओढा**

काल रात्री घडलेल्या घटनेमुळे मुलांना शाळेत पाठवायची भिती वाटते. माझे शिक्षण याच शाळेत झाले आहे. शासनाचे सरकारी शाळांकडे दुर्लक्ष असल्याने पालकांचा ओढा खाजगी शाळेकडे वळला आहे. शासन आणि प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असल्याचे पालक डॉ.सारीका माने यांनी सांगितले.

**अजितदादा विमानतळ नको; शाळांच्या ईमारतीसाठी निधी द्या**

बीड जिल्ह्यातील ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन विद्यार्थ्यांना त्यात अध्यापन करू नये अशा शिक्षण विभागाने सुचना दिलेल्या आहेत.परंतु नाईलाजाने विद्यार्थी आणि शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी ५७५ कोटींचा निधी जिल्हा नियोजन विभागांसाठी मंजुर केला आहे परंतु अद्याप दिला नाही. मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारतीसाठी निधी देण्याऐवजी विमानतळ बांधण्यासाठी अजितदादा आग्रही असुन त्यांनी ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



# प्राचार्य केशव भांगे साहेबांचा भव्य नागरी सत्कार

शिरूर (का.) । प्रतिनीधी

दि.३ जुलै २०२५ वार गुरुवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बदली होऊन आलेले सन्माननीय मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांचे शिरूर कासार व पंचक्रोशीतील विविध मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक,जेष्ठ कार्यकर्ते यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला आहे. आदर्श शिक्षण संस्था बीड' चे सचिव तथा माजी कॅबीनेट मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांनी स्वत: शिरूर (का.) कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे संस्थेतील सर्वात मोठे युनीट असल्या कारणाने प्राचार्य केशव भांगे साहेब हे सक्षम, धराडीचे व तरूणतडफदार व्यक्तीमत्त्व अशी ओळख असल्यामुळे प्राचार्य केशव भांगे साहेबांवर शिरूर (का.) येथील कालिकादेवी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाची जबाबदारी टाकली आहे.

यामुळे मा.अण्णासाहेबांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून नव्याने रूजु झालेले. प्राचार्य केशव भांगे साहेब यांचा अनेकविध मान्यवरांच्या वतीने स्वागत व सत्कार होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीचे शिरूर (का.) तालुका अध्यक्ष सुरेश (अप्पा) उगलमुगले, नगरसेवक गणेश तळेकर, प्रताप कातकडे, अरविंद फरताडे, अजय कुचेरिया, अजिनाथ धोत्रे, तसेच नगरपंचायतचे गटनेते गणेश भांडेकर, नगरसेवक वसंतराव काटे, अर्जूनकाका गाडेकर, सावता कातकडे, अमोल चव्हाण, सभापतीचे प्रतिनिधी प्रा.अक्षय रणखांब, युवा नेते सागर केदार, अंकुश नागरगोजे, प्रकाश ढगे, नवनाथ मिसाळ त्याच प्रमाणे रायमोहचे सरपंच सुभाष (काका) क्षीरसागर, पाडळीचे माजी सरपंच रामदासजी हांगे, शिरूर पंचायत समिती सभापतीचे प्रतिनिधी विजयदादा सरवदे, प्रकाश इंगळे, किरण चव्हाण, अण्णासाहेब राऊत, भारत बहिर, प्रभाकर सानप, तसेच परिसरातील अनेक मान्यवरांनी प्राचार्य केशव भांगे साहेबांचा भव्य असा नागरी सत्कार केला आहे. या प्रसंगी विद्यालयातील, उपप्राचार्य देशमाने सर, पर्यवेक्षक जनार्दन काळे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मोठ्या संखेने उपस्थित होते.

# शेतकरी कामगार पक्षाच्या आंदोलनाला यश

## रूपमाता गुऱ्हाळाकडील उसाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील रुपामाता गुर्हाळाने तालुक्यासह शेतकऱ्यांचा ऊस गाळपास नेऊन तब्बल सहा महिने उलटून गेलेले असताना देखील, गाळप केलेल्या शेतकऱ्यांच्या ऊसाचे पैसे न दिसल्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाने दि.२४ जुन रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शेकडो कार्यकर्त्यांसह हलगी बजाओ आंदोलन करून गुऱ्हाळाच्या संचालकासह उपविभागीय अधिकारी व प्रशासनाला धारेवर धरले होते.

माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी रुपामाता गुऱ्हाळाच्या संचालकाला उसाच्या थकीत रक्कमा शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्याच्या सूचना दिल्यानंतर रुपामाता गुऱ्हाळाच्या संचालकाने त्यासाठी आठ दिवसाचा वेळ मागितला होता. मात्र आठ दिवसानंतर त्यांनी सदरील शेतकऱ्याच्या उसाच्या बिलाच्या थकीत रक्कमा शेतकऱ्याच्या खात्यात जमा झाल्याने पेरणीच्या, मशागतीच्या तोंडावर आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात असून आंदोलन कर्त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# आमदार अमित गोरखे यांना सभापती करून सरकारने समाजाचा मान वाढवला : चांदणे

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या अनेक विविध प्रकारच्या राजकीय घडामोडी होताना दिसून येत आहेत. नुकतेच विधान परिषदेवर घेतलेले आमदार अमित गोरखे साहेब यांना राज्य सरकारने विधान परिषदेचे तालीका सभापती म्हणून निवड करुन महाराष्ट्रातील मातंग समाजाला एका उंचीवर घेऊन जाण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न होतांना दिसत आहे, असे मत धारुर तालुक्यातील समाधान चांदणे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केले.

राज्यातील मातंग समाजाचे युवा नेतृत्व म्हणून राज्य सरकारने आमदार अमित गोरखे साहेब यांना सभापती पदाची संधी देऊन एक युवा नेतृत्व उभा केल्याची चर्चा सध्या महाराष्ट्रात ऐकवयास मिळत आहे. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रामध्ये आमदार झाले मंत्री झाले सहसा राज्यमंत्रीपदापर्यंत पोहोचता आले मात्र नवनिर्वाचित विधानपरिषदेवर आमदार घेऊन त्यांना तालिका सभापती म्हणून त्यांची निवड केली हा समाजाचा अभिमान आहे गौरव आहे, महाराष्ट्रातून श्री आमदार व नवनिर्वाचित सभापती अमितजी गोरखे साहेब यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. स्वत: अमित गोरखे साहेब यांनी सांगितले की, मी इथपर्यंत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून व देवेंद्र फडणवीस यांचा माझ्यावर विश्वास असल्याने मला इथपर्यंत येता आले या पदाचा वापर फक्त समाजासाठीच नव्हे तर महाराष्ट्रातील बहुजन समाजासाठी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्रातून समाजाच्या वतीने सोशल मीडियावर आमीतजी गोरखे साहेब यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पर्यावरण वाचवा - झाडे लावा! केज येथे वृक्षारोपण उपक्रम



केज । प्रतिनिधी

संघर्ष विकास समिती केज, रोटरी क्लब, दिलासा सामाजिक संस्था केज यांच्यातर्फे केज शहरातील मेन रोडच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण रक्षणाची गरज आज अत्यंत महत्वाची बनली आहे. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेली हरितक्षेत्रे आणि हवामान बदल यावर उपाय म्हणून आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकण्याची ही वेळ आहे, असे मत हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब केजचे अध्यक्ष प्रवीण देशपांडे, दिलासा सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या ज्योतीताई सांबरे यांनी यावेळी झाडे जगली पाहिजेत यासाठी पुढाकार घेतला. यामाध्यमातून सर्व जनतेला आवाहन करण्यात आले की आपण सर्वांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन एक नागरिक - एक झाड हे संकल्प व्रत स्वीकारावे असा संदेश देण्यात आला. सकाळी ०९:०० वाजता ०१ जुलै २०२५ रोजी हनुमंत भोसले सरांचा जन्मदिवस असल्या कारणाची या उपक्रमाची रंगत वाढली. यावेळी त्यांना शाल आणि झाड देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सत्यवान राऊत, बापूराव शिंगण, मुसळे, शरद थोरात, राठोड आदी उपस्थित होते.

# रात्रीतून अचानक उभे राहणारे महापुरुषांचे स्मारकं हे भविष्यात धोके ठरु शकतात : पी.डी.कसबे

केज । प्रतिनिधी



भारतीय समाजात महामानवांचे स्मारकं आणि पुतळे समाजासाठी प्रेरणेचे केंद्रबिंदू असतात. हे पुतळे त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा साक्षात्कार घडवणारे असतात. स्मारक व पुतळे ही केवळ वास्तू नसून, ती इतिहास, संस्कृती, मूल्य आणि प्रेरणा यांची प्रतीके असतात. त्यामागील उद्देश समाजप्रबोधन, प्रेरणा, स्मरण आणि सन्मान असा अनेक अंगांनी महत्त्वाचा असतो. एखाद्या महामानव, क्रांतिकारक, समाजसुधारक किंवा योद्ध्याचे योगदान कायम लक्षात ठेवण्यासाठी स्मारक उभारले जाते. पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याची आठवण होत राहते. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, विचारसरणी आणि कर्तृत्व प्रेरणास्त्रोत ठरतात. युवकांना सामाजिक परिवर्तनासाठी दिशा मिळते.

अनेक महामानवांचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात कमी प्रमाणात येतो. स्मारक हे जिवंत इतिहास बनते.स्थानिक किंवा राष्ट्रीय पातळीवरील ऐतिहासिक घटनांची आठवण ठेवली जाते. विविध जाती, धर्म व पंथ यांना एकत्र आणणाऱ्या व्यक्तींचे स्मारक समाजात सौहार्दाचे वातावरण निर्माण करते. समाजाची सांस्कृतिक ओळख, परंपरा आणि मूल्ये जपण्याचे काम स्मारक करतात. पुतळे आणि स्मारकांमुळे त्या ठिकाणी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या वाढ होते. परंतु वास्तव स्वीकारून दुसऱ्या बाजूने विचार केल्यास भविष्यात याच पुतळ्यांशी संबंधित काही धोके आणि षडयंत्रे उद्भवू शकतात, कारण सध्या गाव, शहर, आणि महानगरांमध्ये अचानक रात्रीतून महापुरुषांची स्मारकं आणि पुतळे उभारली जात असताना आपण पाहत आहोत.

महामानवांचे विचार विसरून केवळ त्यांच्या मूर्तींची पूजा केली जात असेल, तर हे समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड वाढवते आणि खरी सामाजिक क्रांती थांबते याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पुतळ्यांच्या जागा, स्थापना किंवा हटवणे यावरून विविध गटांमध्ये तणाव निर्माण होताना पहायला मिळतो. काही ठिकाणी पुतळ्यांची विटंबना किंवा तोडफोड झाल्यास मोठे सामाजिक संघर्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुतळे हे निवडणूकपूर्व काळात मतांसाठी वापरले जातात. महामानवांच्या नावाचा वापर करून राजकीय गट स्वतःची प्रतिमा वाढवतात, पण त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करत नाहीत ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. काही गट किंवा संस्था स्मारकांच्या माध्यमातून चुकीचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न करतात. यामुळे पुढील पिढ्यांमध्ये गोंधळ निर्माण होतो व खरा इतिहास विसरला जातो. काही महामानवांचे स्मारक केवळ एका जाती, धर्म, किंवा गटाशी जोडले जातात. त्यामुळे एकात्मतेचा उद्देश न राहता, ते आपलं आणि त्यांचं असं विघटनात्मक स्वरूप निर्माण होऊ शकते. स्मारक उभारणीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, पण तेच पैसे जर शिक्षण, आरोग्य, रोजगारावर खर्च झाले, तर अधिक प्रभावी ठरते. खर्चाचे प्रमाण आणि त्याचा वापर किती समाजोपयोगी आहे, याचा विचार न केल्यास संसाधनांचा अपव्यय होतो. अनेक ठिकाणी पुतळे उभारले जातात पण त्यांची देखभाल होत नाही. ओसाड, अस्वच्छ आणि दुर्लक्षित पुतळे हे त्या महामानवांचा अपमान ठरतात. यासाठी सावधगिरी व आपली जबाबदारी म्हणून पुतळयांसोबत विचार प्रसार करणाऱ्या केंद्रांची स्थापना करावी. प्रत्येक स्मारकाजवळ माहिती केंद्र, पुस्तकालय, शैक्षणिक कार्यक्रम राबवावेत. स्मारकांना राजकीय प्रतिष्ठेचे नव्हे तर जनजागृतीचे साधन बनवावे. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या स्मारकांचे संवर्धन करावे. थोडक्यात सांगायचे झाल्यास स्मारक हे प्रेरणेचे स्त्रोत आहेत, पण जर त्यांचा गैरवापर झाला, तर ते फक्त निर्जीव पुतळे उरतात. त्यामुळे आपली जबाबदारी आहे की महामानवांचे स्मारक हे विचार जागवणारे केंद्र बनावे, ना की केवळ राजकीय प्रदर्शन.

छत्रपती शिवाजी महाराज चौक केज येथील चौकाचा घेर अधिक असल्यामुळे मोठी अवजड वाहने वळण्यास जागा अपुरी पडत आहे. याचमुळे तिथे अनेकदा अपघात घडतात. त्याच बरोबरीने चौकाच्या कठड्याला वाहनांचे धक्के लागून, चौकाची तोडफोड व नुकसान होत आहे. त्यामुळे चौकाचा घेर थोडा कमी करून, भक्कम कठडा बांधून, योग्य सुशोभीकरण केल्यास केज शहराची व महामानवांची शान वाढेल यात तीळमात्र शंका नाही.

पान १ वरून...

## सईद खान नेमका कोण आहे शिक्षण...

तर त्याचं फोन सुद्धा शिक्षण विभागातील कर्मचारी म्हणजेच ५०० कोटीच्या घोटाळ्यातील महामेरू आहे. त्या ठिकाणी नागरे नावाच्या नानाला जपण्याचं काम करत आहेत. कारण नागरे नाना हा पण काढण्याच्या प्रयत्नात असतो. त्यामुळे नागरे नाना वरती सुद्धा खूप मोठी जिम्मेदारी होती की, तो संस्थाचालकांकडून माया जमा करून फुलारी नागनाथ शिंदे लक्ष्मण बेरडकर यांना लागेबांधे कुठे कसे आहेत हे सांगण्यात व्यस्त असताना नाना मात्र ऐशो आरामाची जिंदगी जगत आहे.

## पिंपळनेरचे एपीआय मधुसुदन घुगेची दबंग कारवाई...

आरोपींची नावे हनुमान खंडेराव गायके (वय ३१ वर्ष), सचिन विठ्ठल वादे (वय ३५ वर्ष) दोघेही रा. नाळवंडी, जि. बीड, बळीराम खंडेराव गायके (रा. नाळवंडी) हा स्कूटी सोडून पळून गेला. पोलिसांनी देशी दारू (बॉबी संत्रा) एकूण १,५४४ बाटल्या (किंमत: ६६,०८०) चारचाकी स्विफ्ट गाडी (चक४७छ५६२७)- ५,००,०००/- टी.व्ही.एस. स्कुटी (चक२३इच४८३६) १,००,०००/- दोन मोबाईल फोन्स (जीं किंपनी) ४०,००० एकूण किंमत: ७,०६,०८०/- मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी सदर देशी दारूचे नमुने पंचासमक्ष वेगळे काढून सीए प्रयोगशाळेसाठी राखून ठेवले आहेत. संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (र), ६५ (श), ८१, ८२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगे, पो.उ.नि. गोलवाल, पो.अं. दीपक धोंडे चापोशि-२२७० चव्हाण, होमगार्ड-१९२६ झुगे, होमगार्ड-१९१५ पवार, होमगार्ड-१९१६ राठोड, होमगार्ड-१९४३ मुंजाळ, होमगार्ड १९४६ निरधार यांनी केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## बीडमध्ये 'सीट्रिपल आयटी'ला जागेसह निधी देण्याचा निर्णय

आहे. जिल्हा प्रशासन या प्रकल्पासाठी ३३ कोटींचा खर्च उचलणार असून, प्रशिक्षणाचा खर्च पहिल्या तीन वर्षांसाठी टाटा टेक्नॉलॉजीकडून केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे उद्योग आणि रोजगाराच्या संधीमध्ये बीड जिल्ह्यात नवा अध्याय सुरू होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील तरुणांना रोजगार, कौशल्यविकास आणि नवीन तंत्रज्ञान प्रशिक्षणाची संधी मिळणार असून जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळणार आहे, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त करत अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. तसेच, जिल्ह्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळणार असून औद्योगिक वातावरण विकसित होईल, असेही म्हटले आहे.

# 'अभि नहीं तो कभी नहीं' हे लक्षात ठेवून आझाद मैदानावरील आंदोलनात बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी सहभागी व्हावे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्प्यासाठी लागणारा निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. तसेच बुधवार दि.०२ जुलै रोजी शिक्षक आमदार आणि पदवीधर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार निधी उपलब्ध करून द्या या मागणीचे निवेदन दिले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षक व पदवीधर आमदारा सोबत तात्काळ निधी संदर्भात बैठक घेऊन मार्ग काढु सांगितले आहे. त्यामुळे सर्व आमदार त्यांच्या परीने प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे आंदोलनस्थळी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची गरज



आहे. तसेच शिक्षक समन्वयक संघाने ८ व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळा बंद करून मोठ्या संख्येने आंदोलनाला उपस्थित रहावे असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे), बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासन निर्णय ही काढला आहे. परंतु सलग नवीन सरकारचे तीन अधिवेशन झाली. या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झालेली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे.

या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे), बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, उपाध्यक्ष रामदास जामकर, उपाध्यक्ष अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख, जिल्हा संघटक प्रताप देशमुख, जिल्हा सहसंघटक बाळासाहेब नागरगोजे, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे, महिला सचिव सुरेखा गायकवाड, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पाटोदा तालुका अध्यक्ष अंकुश गवळी, शिरूर तालुका अध्यक्ष दशरथ साबळे, माजलगाव तालुका अध्यक्ष चंद्रशेखर तौर, वडवणी तालुका अध्यक्ष वैजनाथ शिंदे, परळी तालुका अध्यक्ष गोविंद आघाव, धारूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर मुंडे यांच्यासह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

## धारूर तालुक्यातील रमाई, पीएमच्या बोगस घरकुलाची चौकशी करा : सुरज लोखंडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर तालुक्यातील पंचायत समितीच्या घरकुल विभागाचे सर्वच आधिकारी आणि इंजिनियर घरकुल लाभार्थ्याकडून ७ ते १० हजार रुपये घेऊन घरकुल न बांधता घरकुलाचे फाप्ते काडत आसल्याने तालुक्यातील लाभार्थी नागरिक त्रस्त झाले आहेत. ज्या लाभार्थ्यांनी घरे बांधली आहेत आश्या नागरिकांना पण हापत्याला ५ हजार रुपये दिले तरच त्यांचे हाप्ते टाकले जातात अन्यथा ६ ते ७ महिने त्या लाभार्थ्यांना पंचायतसमीतीच्या चाकरा माराव्या लागतात.



पैसे न देणाऱ्या लाभार्थ्यांचे कामे जाणून बुजून केली जात नाहीत या पैसे पागनीच्या साखळी मध्ये सर्वच पंचायत समितीच्या घरकुल विभागाचे आधिकारी सामील आहेत. इंजिनियर जिओ टचाग करण्याआधी पैश्याची मागणी करतात. प्रत्येक हप्ता काडण्यासाठी ५ ते ७ हजार रुपये दिल्यानंतर लभार्थ्यांनी घरकुल किती पैश्यामध्ये बांधावे हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. या अधिकाऱ्यांकडून शासनाची आणि गरीब लघर्थ्यांनी मोठी फसवसणूक केली जात आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करुन अश्या अधिकाऱ्यांना निलंबित करावे अन्यथा धारूर पंचायत समितीवर हजारो घरकुल लाभार्थ्यां कार्यकर्त्यांना घेऊन मोर्च्या काढणार आसल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुरज (भाऊ) यांनी माध्यमांना सांगताना दिला आहे.



## राहूल देशपांडे यांनी सकारात्मक पत्रकारिता जोपासली : ॲड. धायगुडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून हा प्रगल्भ वारसा पुढे नेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत असे मत प्रख्यात विधिज्ञ ॲड. राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी व्यक्त केले ते जयहिंद ग्रूप च्या वतीने राहूल देशपांडे यांच्या जन्मदिना निमित्तच्या अभिष्टचिंतन छोटेखानी कार्यक्रमात बोलत होते. मंचावर मेजर एस.पी. कुलकर्णी, प्रा.डॉ.गणेश पिंगळे, प्राचार्य रमण देशपांडे, भागवत मसने, दत्ता बन्सोडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.पिंगळे म्हणाले की, राहूल देशपांडे यांनी परिसरातील बातम्या प्रकाशित केल्या त्यामुळे त्या कार्याची सर्वदुर पर्यंत प्रसिद्धी झाली. प्राचार्य डॉ.रमण देशपांडे म्हणाले की, राहुल देशपांडे यांचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी असून स्वत:परिश्रम करून ते कार्य तडीपार नेतात.एस.पी. कुलकर्णी म्हणाले की, आपण समाजाचे काही तरी देणे लागतो या भावनेतून राहूल देशपांडे यांनी आपल्या पत्रकारितेचा उपयोग केला त्या ध्येय्या प्रमाणे आपण काही तरी करू शकतो हा संकल्प प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय समारोपात भागवत मसने म्हणाले की,समाज सुधारणेच्या विचारातूनच राहुल देशपांडे यांचे व्यक्तिमत्व घडले आयुष्यात यशस्वी असावे या धेय्याने प्रेरित होवुन सक्षमपणे पत्रकारिता केली असे सांगितले. यावेळी सर्वांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व दिर्घायुष्याची कामना केली. राहूल देशपांडे यांच्या हस्ते व सर्वांच्या उपस्थितीत वृक्ष संवर्धन मंडळाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.


## बेग अमीर बी यांनी मिळवली पी.एच.डी डॉक्टरेट

माळापुरी । प्रतिनिधी

येथील सेवानिवृत्त इमाम मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांनी माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास या विषयावर पी.एच.डी डॉक्टरेट मिळवली आहे. माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या त्या पहिली महिला असल्याने गावासाठी प्रेरणा स्थान ठरल्या आहे.



असे की, माळापुरी येथील मूळचे रहिवासी आणि कतर देशातील मस्जिदचे सेवानिवृत्त इमाम आणि इस्लामिक विद्वान मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांना शिक्षण विद्या शाखेतून माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास या विषयावर दि.२७ जून २०२५ रोजी पी.एच.डी डॉक्टरेट प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या कार्यात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील डी.एस.आर. कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.एजाज अली यांचे अमूल्य असे मार्गदर्शन राहिले आहे. बेग अमीर बी यांनी मिळविलेली पी.एच.डी डॉक्टरेट माळापुरी गावासाठी ऐतिहासिक यश ठरले असून बेग अमीर बी ह्या माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिली महिला असल्याने त्या गावासाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. यावेळी बेग अमीर बी यांचे वडील मिर्झा अब्दुल अझीज बेग यांनी आपल्या मुलीच्या यशाबद्दल अपार आनंद व्यक्त केला असून सर्व नातेवाईक आणि गावकऱ्यांनी बेग अमीर बी यांना शुभेच्छा दिल्या.



बीड : पोलीस कर्मचारी संघर्ष गोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मा.नगरसेवक सय्यद मुस्तफा, मोसिन मेंबर, युवा नेते शेख अखिब, गुड्डू नेते, फहीम इनामदार, इरफान मोहम्मद, सय्यद गौस, मोमिन रेहान व मित्र परिवार.

## बीड येथे आजपासून चार दिवस रंगणार आषाढी महोत्सव संगीतमय कथा व सांप्रदायिक कीर्तने

### स्व.झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठानामार्फत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सांप्रदायिक कीर्तनाची परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त संपूर्णमहाराष्ट्रात आणि देशभरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. पंढरपूरची वारी गाठता न आलेल्या भाविकांसाठी बीडमध्येही अध्यात्मिक वातावरणाची अनुभूती यावी, या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळयाचे आयोजन दिनांक ४ ते ७ जुलै २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. या चार दिवसीय भक्तिमय सोहळ्याचे आयोजन बीड येथील खटोड प्लाझा, वृंदावन गार्डनजवळ, एमआयडीसी रोड येथे पार पडणार आहे.

या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कथाकार व कीर्तनकार सहभागी होणार असून, विशेष आकर्षण ठरणार आहे. साध्वी सोनाली दिदी करपे (चकलांबा) यांचे नवनाथ कथेचे संगीतमय, रसाळ आणि सखोल निरूपण तसेच इतर अनुभवी कीर्तनकार आपल्या कीर्तनसेवेने भाविकांना मंत्रमुग्ध करतील. विशेष आकर्षण दि.६ जुलै २०२५ (आषाढी एकादशी) डॉ.रमेश घोडके व डॉ.उर्मिला घोडके यांच्या वतीने सर्व भाविकांसाठी फराळ प्रसादाचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. फराळाची वेळ सकाळी १२ ते दुपारी ३ असणार आहे. गेल्या वीस वर्षांपासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य खटोड प्रतिष्ठान सातत्याने करीत आले आहे. समाजात अध्यात्मिक मूल्ये रुजावीत, संतांच्या विचारांचे चिंतन व्हावे, याकरिता हे आयोजन विशेष महत्त्वाचे ठरत आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी आपल्या परिवारासह या भक्तिपूर्ण महोत्सवात उपस्थित राहून संगीतमय कथा, कीर्तन व फराळ प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

स्व. झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड
राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव

## कर्तव्य दक्ष अधिकारी डॉ.नरेश कासट यांची दासखेड आरोग्य केंद्रास भेट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून विविध प्रकारचे कार्यक्रम वेळी वेळी घेतले जातात. मागील दोन दिवसांपूर्वी दवाखाना परिसरात शोभेचे झाडे व फळ झाडे यांची लागवड करण्यात आली होती. या संदर्भात भेट दिली.व तसेच दवाखाना मधील काही अडचणी संदर्भात चर्चा झाली ते लवकरच मार्गी लाऊ असा शब्द देखील दिला.

सेवा क्षेत्रात काम करणारे आणि आपल्या कामावर निष्ठा ठेवून, समाजासाठी समर्पित असलेले अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. ते त्यांच्या कामात प्रामाणिक असून अधिकारी कर्मचाऱ्यावर वाचून सहकार्याची भावना नेहमीच ठेवतात. अडीअडचणी जाणून घेत सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी सदैव तत्पर आहे असेही त्यांनी सांगितले, यावेळी डॉ.शरयू पडोळे, सय्यद कादर, सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार, गणेश मस्के, प्रदिप गोरे, राहुल चव्हाण, शेख मिनाज ताई, लखन पवार, गणेश सरडे, अश्विनी सोनवणे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पंडित जवारलाल नेहरू महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळीतील पंडित जवारलाल नेहरू कला, वाणिज्य जे विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय परळी वैजनाथ हया महाविद्यालयात हरित क्रांती चे जनक वसंतराव नाईक यांची जयंती १ जुलै २०२५ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी वसंतराव नाईक ह्यांचा प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. बी.डी. मुंडे ह्यांचा हस्ते करण्यात आले.

त्यांचा जीवन चारित्र्यावर प्रकाश टाकता वेळी ते असे म्हणाले की, राज्यातील शेतकरी, शेतमजूर कामगार वाडी, तांडा गावातील लहानात लहान घटकाचा विकासा साठी सत्तेचा वापर करणारे दीर्घकाळ मुख्यमंत्री म्हणून कार्यरत राहिलेले हरित क्रांती घडून आणणारे गोर गरीब जनते चे कैवारी होते. या वेळी उपस्थित प्रा. सचिन डाळे, प्रा. गुठे, नरहरी मुंडे, अमर चव्हाण, नागनाथ साबणे, गीते मॅडम, ब्रम्हानंद कांबळे, शेख अब्दुल आदी उपस्थित होते.



## टी. सी हरवला आहे

रोहिणी राघुनाथ तोंडे वर्ग १० वी या विद्यार्थिनीचा प्रवास करताना तेलगाव धारूर बस मध्ये टी.सी. हरवला आहे जर कोणाला सापडला तर संपर्क साधा.

संपर्क
रोहिणी राघुनाथ तोंडे
मो.न.९६१३७५७६७७

## एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या; पोस्ट ऑफिस मध्ये कर्मचारी व काऊंटर वाढवा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या, तसेच पोस्ट ऑफिस मध्ये नागरिकांची वाढती गर्दी पहाता कर्मचारी व काऊंटर यांची संख्या वाढवावी अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे, शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी अंबाजोगाई शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना मंगळवार, दिनांक १ जुलै रोजी दिलेल्या दोन स्वतंत्र निवेदनातून केली आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या पहिल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजवादी पार्टी, अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी तसेच एस.टी.आगारप्रमुख यांना यापूर्वी दि.३० एप्रिल २०२५ रोजी निवेदन देण्यात आलेले आहे. तरी एस.टी डेपो मॅनेजरने सांगितले की, याबाबत आपण पोलीस स्टेशनला ही कळवा. म्हणून आज रोजी आम्ही आपणांस निवेदन देत आहोत. विषय असा की, पोलिस प्रशासनाने अंबाजोगाई शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर जागा उपलब्ध करून दिल्यास आम्ही एस.टी तिथे थांबवू, पुर्वी एस.टी बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील जिल्हा परिषद शाळेसमोर थांबत होत्या.

तेथेच प्रवासी बसेस मधून उतरत असत. सध्याच्या थांबामुळे रहदारी व वाहतूकीस मोठा अडथळा निर्माण होतो आहे. कारण, मोंढा रोडपासून ट्राफिक जाम होतो. मोंढा येथे दर मंगळवारी बाजार भरतो. तसेच या परिसरातच न्यायालयाकडे व स्वाराती रूग्णालयाकडे जाणारा रस्ता आहे. आणि आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसराकडे जाणारा रस्ता व श्री योगेश्वरी देवी मंदीराला जाणारा रस्ता ही आहे. मोंढ्याकडून आणि स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाकडून दोन्ही साईडची ट्राफीक छत्रपती शिवाजी महाराज चौक नजीक मध्यभागी एसटी बसेस थांबत असल्यामुळे जाम होते. त्यामुळे एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्यावा तसेच अंबाजोगाई येथील पोस्ट कार्यालयात फार पुर्वीपासून जेवढे काऊंटर आहेत.

आज सुध्दा तेवढेच काऊंटर व कर्मचारी आहेत. वाढते शहरीकरण आणि नागरिकीकरण पहाता तसेच दिवसेंदिवस पोस्टाच्या विविध सुविधांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांची संख्या ही वाढत आहे. मुलभूत सुविधा तात्काळ मिळत नाहीत. यासाठी ग्राहक तसेच जेष्ठ नागरिक यांना पोस्ट ऑफिस मध्ये गर्दीमुळे ताटकळत थांबावे लागते. बँक व्यवहारासाठी तसेच रजिस्टर पोस्ट आणि विविध कामांसाठी काऊंटर कमी असल्यामुळे खूप वेळ वाया जातो. तरी पोस्टमास्टर यांनी वरीष्ठांना याबाबत त्वरित कळवावे आणि अंबाजोगाई पोस्ट ऑफिस कार्यालयात काऊंटरची संख्या व कर्मचारी वाढविण्यात यावेत. तसे न झाल्यास अंबाजोगाई पोस्ट ऑफिससमोर अंदोलन करण्यात येईल याची संपुर्ण जबाबादारी पोस्ट मास्टर यांच्यावर राहील, असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




## खडतर परिस्थितीवर मात करत उभारला स्वता:चा कारखाना!

### गणेश मुर्तीच्या माध्यमातून अहिल्यानगरच्या नजन कुटुंबाची ओळख

आष्टी । प्रतिनिधी

वयाच्या अघव्या बारा वर्षांपासून गणेश मुर्तीचा छंद जोपासला, अनेक व्यावसायिकांकडे काम केले. घरची परस्थिती हालखीची असल्याने मनात इच्छा असताना देखील स्वताचा व्यवसाय उभा करता येत नव्हता, पत्नी व तीन लेकरांना हाताशी धरून उसनवारी व बॅकेचे लोन काढून स्वताचा व्यवसाय उभा केला. अन् अल्पवधीत अहिल्यानगर जिल्ह्यात नजन कुटुंबाने गणेश मुर्तीच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केली आहे.



अश्या जिगरबाज अनिल नजन याची यशोगाधा...

अहिल्यानगर शहरातील बोल्हेगांव येथील अनिल प्रभाकर नजन यांना लहानपणापासून गणेश मुर्ती बनवण्याचा छंद होता. हा छंद पुर्ण करण्यासाठी त्यांनी अनेकांच्या गणेश मुर्तीच्या कारखान्यात काम केले. नंतर आपण स्वताहाचा कारखाना उभारावा यासाठी धडपड सुरू केली. पण परिस्थिती हालखीची असल्याने पैसा उभा करताना अनंत अडचणीचा सामना करावा लागला. सुरवातीला काही उसनवारी पैसे जमा केले. पण त्यातही पडतळ बसत नसल्याने बॅकेचे लोन घेतले आणि अहिल्यानगर शहरातील शिवाजीनगर येथे किरायाच्या जागेत गणेश मुर्ती बनवण्याचा कारखाना सुरू केला. यासाठी पत्नी उषा, मुलगी अनिषा, तनिष्का, मुलगा शिवांश याच्या मदतीने हा व्यवसाय सुरू आहे. आज आठ वर्षांपासून हा व्यवसाय स्वताच्या बळावर सुरू असून यासाठी कलरच्या गोण्या, भाडे, शाडू यासह विविध साहित्यांसाठी वार्षिक तीन ते चार लाखांचा खर्च होतो. यातून वर्षाकाठी खर्च वजा होता अडीज तीन लाख रूपये हाती येतात. ही गणेशमुर्ती अहिल्यानगर, बीड, नाशिक, पुणे यासह अनेक शहरात विक्रीसाठी जाते. ७० रुपयापासून तीन हजार रूपयापर्यत किंमती आहेत.

# महिला व बालविकास विभागाचा तुघलकी कारभार

## जिथं शाळांनाच ईमारती नाहीत; म्हणे अंगणवाडीचे शाळेत स्थलांतर करा; निधीअभावी सरकारकडून पळवाट तर ५५ कोटींचा प्रस्ताव धुळखात पडुन : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

ज्या अंगणवाडी केंद्राना स्वतःची इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्रे नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत महिला व बालविकास विभागाने दि.२ जुलै रोजी अध्यादेश काढला आहे. परंतु अध्यादेश काढण्यापुर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांना तरी पुरेशा इमारती आहेत का? सुस्थितीत आहेत का? सुरक्षित आहेत का? याचा विचार केलेला नाही. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन त्याठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविले असुन ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती तर ८५६ वर्गखोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज असल्याचे म्हटले आहे. जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या तर काही ठिकाणी झाडाखाली, समाज मंदिर, चावडीत बसुन शिक्षण घेत आहेत. आता या आदेशामुळे शासनाचा तुघलकी कारभार समोर आल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.



एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील राज्यातील ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वतःचे इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्र नजीकच्या जिल्हा परिषद शाळेमधील रिक्त खोल्यांमध्ये स्थलांतरित करण्यात शासनाने मंजुरी दिलेली आहे. सदरील धोरण जी अंगणवाडी केंद्र भाड्याच्या जागेत, समाज मंदिर इत्यादी ठिकाणी कार्यरत आहेत त्यांच्याकरता लागू करण्यात आले आहे. अंगणवाडी केंद्र स्थलांतरित करताना अंगणवाडीचे सध्याचे ठिकाण व जिल्हा परिषदेच्या ज्या ठिकाणच्या शाळेमध्ये अंगणवाडी स्थलांतरित करायचे आहे अशा ठिकाणांमधील अंतर हे एक किलोमीटर पेक्षा जास्त नसावे, अंगणवाडी वर्गखोली देताना शाळेमधील स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, क्रीडांगण, क्रीडा साहित्य इत्यादी सुविधांचा अंगणवाडी केंद्रांमधील बालकांकरीता वापर करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळा इमारतींची अवस्था अत्यंत वाईट आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थी उघड्यावर बसत आहेत, अनेक ठिकाणी वर्ग खोल्या कमी पडत असल्याने दोन-तीन वर्ग एकत्रित बसवावे लागत आहेत. शासनाने अंगणवाडीसाठी नवीन अध्यादेश काढून गावपतळीवर काय स्थिती आहे यापासून सरकार कोसोदुर असल्याचे दाखवून दिल्याचे दिसत आहे.

### जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती

बीड जिल्ह्यात यु-डायस २०२३-२४ च्या माहितीनुसार जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा आहेत. या शाळांमध्ये १०,४७९ वर्गखोल्या असुन यातील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन याठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविले आहे. तसेच ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती आणि ८५६ वर्गखोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज आहे.

### शिक्षणावर ५ टक्के खर्च

मागील दोन वर्षात शाळांवर केलेला खर्च पाहिला तर तो तिर्थक्षेत्रांपेक्षाही कमी असल्याचे दिसून येत आहे. सन २०२३-२४ मध्ये ३०.६३ कोटी तर २०२४-२५ मध्ये ३१.८६ कोटींचा खर्च शाळांवर केलेला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या एकुण खर्चापैकी ५ टक्के निधी शिक्षणावर खर्च केला जातो.

### ५५ कोटींचा नव्याने प्रस्ताव

५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्ती करीता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रूपयांचा निधी व ५१९ धोकादायक वर्ग खोल्यांच्या बांधकाम व पत्र्यांच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमध्ये ३८ वर्गखोल्या बांधकामासाठी असे एकुण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.



# आशेचे द्वार प्रतिष्ठानच्या वतीने गरजू लोकांसाठी छत्री वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील आशेचे द्वार प्रतिष्ठान या संस्थेमार्फत दिनांक १५ जून २०२५ रोजी पूरग्रस्त कॉलनी येथे गरजू लोकांसाठी छत्री वाटप करण्यात आले. या कार्याचा लाभ एकूण ३६ लोकांना झाला.

या कार्यक्रमासाठी आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री जोसेफ सर, खजिनदार श्री प्रशांत खवडिया सर, सचिव सचिन जाधव सर, प्रोजेक्ट डायरेक्टर श्री प्रदीप लोंढे सर, तसेच संस्थेचे पर्यवेक्षक श्री विलास नवगिरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, संस्थेचे स्वयंसेवक लक्ष्मण वार भवन यांच्या हस्ते छत्री वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपस्थित सामाजिक कार्यकर्ते निलेश घोरपडे, नारायण कांबळे, संदीप खंडागळे, गणेश गायकवाड, सुशांत (दादा) सतराळकर, आदित्य वारभुवन अर्जुन जोगदंड सिस्टर राणी रोकडे यांची उपस्थिती होती.

# सादेक इनामदार यांच्यावर दाखल खोटे गुन्हे मागे घ्या

धारुर । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांच्या वर दाखल खोटा गुन्हा मागे घेण्याची मागणी धारुरचे तहसीलदार निळे व सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे अध्यक्ष इंजि. सादेक इनामदार यांच्यावर दि.२ जुलै रोजी बीड येथे विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्यात आला. याबाबत इनामदार यांच्या समर्थकात तीव्र नाराजी पसरली असून आज दि.३ गुरुवारी येथील तहसील कार्यालय व पोलिस स्टेशन येथे इनामदार यांच्या समर्थनार्थ खोटे गुन्हे मागे घेण्याची मागणी करण्यात आली.



यावेळी सादेक इनामदार यांनी देशहितासाठी यापुर्वी अनेक भ्रष्टाचार उघड करुन आता शिक्षण विभागातील कोट्यवधी रुपयांचा घोटाळा उघडकीस आणला असल्यामुळे त्यांच्या वर बीड शिक्षण विभागात कार्यरत महिलेने विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केला आहे. सादेक इनामदार यांनी यापुर्वीच पोलिस अधिक्षक व मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे संशय व्यक्त करत लेखी निवेदन दिले आहे. यामुळे सदरचे खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष आशोक जाधव, ड. शेख शाहजेब, समीर डफाली, शहेबाज पठाण, गुड्डू शेख यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिंदे वस्ती (गोपळखीळा) शेतरस्त्यांचा पंचनामा : महसुल अभिलेखात नोंदणीचा मार्ग मोकळा

शिरुर । प्रतिनिधी

सर्वांसाठी शेत रस्ता या मागणीसाठी शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगाचे अध्यक्ष शिवराम राऊत यांच्या वतीने अनेक वर्षापासुन प्रचलित व प्रत्यक्ष वापरातील शेत रस्ते, गाडीरस्ते, पायवाट, वस्ती रस्ते, पांदन रस्ते, शिवरस्ते यांची महसुली अभिलेखात नोंदनी करुन गावनकाशात प्रमाणित (समाविष्ट) करणे या मागणी नुसार शिरूर चे तहसिलदार सुरेश जी घोळवे साहेब यांच्या आदेशान्वये महसुल प्रशासन व ग्रामपंचायत हिवरसिंगा यांच्या ग्राम रस्ता समिती यांच्या संयुक्तपणे प्रा.जि.मा.१९ पासुन पश्चिमेकडे शिंदे वस्ती (गोपळखीळा) कडे जाणारा प्रचलित व अनेक वर्षापासुन वापरातील असणारा शेत रस्ता महसुली अभिलेखात नोंदनी करून गाव नकाशात व ग्रामीण मार्ग म्हणून ग्रामीनविकासात नोंदनी करण्यासाठी ज्ञानोबा शिंदे, शिवाजी शिंदे,



सतिश शिंदे, निवृत्ती शिंदे, उमेश शिंदे, शंकर शिंदेसह सर्व शेतकऱ्यांच्या मागणीस्तव शहादेव सानप (मंडळ अधिकारी), गणेश बडे (तलाठी), ज्ञानदेव सानप (पं.स.सदस्य शिरूर), भिमराव सानप (तंटामुक्त समिती अध्यक्ष), शिवराम राऊत, रामेश्वर पांडुळे, नारायण गिरी यांच्यासह ग्राम रस्ता समिती पदाधिकारी यांनी प्रा.जि.मा.१९ पासुन ते शिंदे वस्ती पर्यंतचा शेत रस्ता प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पाहणी केली त्यानुसार स्थळ पाहणी अहवाल तयार करून शेत रस्ता ज्या-ज्या गटातून जात आहे. त्या गटाच्या इतर हक्कात नोंद करण्यासाठी तहसिलदार यांच्या पटलावर सादर करून पुढील नियोमोचित कार्यवाही करून शिंदे वस्ती (गोपळखीळा) मधील सर्व शेतकऱ्यांच्या अनेक वर्षापासुन प्रलंबित आसणाऱ्या मागणीतून शेत रस्ता ग्रामीण मार्गात नोंद होण्याची प्रारंभीक स्थिती पार पडल्याने सदरील शेत रस्ता हा विकसित होणार आसल्याने शेतकऱ्यांनी समाधान शिवश्री कृषिमंडळ व ग्रामरस्ता समिती हिवरसिंगा व महसुली प्रशासनाचे आभार मानले. तसेच मौ.हिवरसिंगातील शेतकऱ्यांनी आप-आपल्या शेतरस्त्याच्या समस्या तलाठी यांच्या मार्फत ग्राम रस्ता समिती हिवरसिंगा यांच्याकडे देऊन शेत रस्ता खुला करणे, त्याची पाहणी करून अभिलेखात नोंदनी करण्यासाठी पुढे यावे, असे मत शिवराम राऊत यांनी व्यक्त केले.



# रूपामाता नॅचरल शुगरने ऊस बिलाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात केले वर्ग

## चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड यांनी दिली माहिती



माजलगाव । प्रतिनिधी

रोषणपुरी येथील रूपामाता नॅचरल शुगरचे ऊस बिलाचे पैसे २७०० रूपयाने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी आपापले खाते तपासून घ्यावे मागील काही दिवसांपासून काही लोकांकडून जाणीवपूर्वक रूपामाता नॅचरल शुगरचे नाव वैयक्तिक हेतू पुरस्सर बदनाम करण्यासाठी प्रयत्न केले जात होते आणि शेतकऱ्यांचे बिले थकविल्याचे सांगून शेतकऱ्यांना चिंताग्रस्त करण्याचे काम काही लोकांकडून होताना दिसत होते. कोणाच्याही भूलथापांना शेतकऱ्यांनी बळी पडू नये असे पण यावेळी सांगण्यात आले.

शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बिलाचे २७०० प्रति टणाप्रमाणे पैसे वर्ग करण्यात आलेले असून यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केलेला आहे. रूपामाता नॅचरल शुगर हे सदैव शेतकऱ्यांच्या हितासाठीच असून यामध्ये कोणाचेही पैसे बुडवण्याचा हेतू नसतो परंतु काही कारणास्तव ऊस बिल अदा करण्यासाठी विलंब झाला होता याचा फायदा घेऊन काही लोकांनी या कारखान्याचे नाव खराब करण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु त्यांचे हे प्रयत्न असफल झालेले आहेत व ज्या शेतकऱ्यांचे ऊस बिलाचे पैसे कारखान्याकडे होते. त्यांचे पैसे खात्यात वर्ग करण्यात आलेले आहेत अशी माहिती कारखान्याचे चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड यांनी दिली आहे.

माजलगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेला रुपामाता कारखाना नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करत असून या कारखान्याकडून कसलेही प्रकारची फसवणूक केली जाणार नाही. या परिसरातील शेतकऱ्यांनी आपला ऊस आमच्या कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड तसेच संचालक एडवोकेट अजितराव गुंड, भाऊसाहेब गुंड व कारखाना संचालक मंडळ यांनी केले आहे.

# भटक्या - विमुक्त आदिवासी समाजाच्या न्यायिक मागण्यांसाठी आवश्यक पाठपुरावा करणार : राजेभाऊ फड

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त समाजाच्या न्याय हक्काच्या अनेक मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट देऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. भटक्या आणि विमुक्त समाजाच्या ज्या न्याय हक्काच्या मागण्या आहेत त्या पूर्ण होईपर्यंत आपण त्यांच्या पाठीशी आहोत, तसेच त्यासाठी जो पाठपुरावा करता येईल तो येणाऱ्या काळात आपण नक्कीच करू असे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.



महाराष्ट्र विधिमंडळाचे सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे. याच दरम्यान भटक्या विमुक्त आदिवासी समाजाच्या अनेक मागण्यांच्या संदर्भाने आंदोलन सुरू आहे. यानुषंगाने त्यांनी पाच मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने भटक्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय व मंत्री, नागरिकत्वाचे पुरावे, जमिनीचे नियमन, समाजावरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी संरक्षक कवच तसेच ३१ ऑगस्ट हा विमुक्त दीन साजरा करावा अशा मागण्या भटके विमुक्त संयोजन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आल्या आहेत. शासनाने या मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी मुंबई येथे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट दिली. आंदोलकांच्या मागण्या समजून घेऊन त्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी आवश्यक असेल तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.

# विवेकवर्धिनी शाळेच्या डीपीभोवती झाडांचा विळखा काढला

## ॲड. मनोज संकाये यांच्या मागणीनंतर महावितरणचा झपाट्याने प्रतिसाद!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील शारदा नगर परिसरातील विवेकवर्धिनी शाळेजवळील महावितरणच्या डीपीभोवती झाडे, वेली व झुडपांनी घातलेला विळखा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला गंभीर धोका ठरत होता. सुरू असलेल्या पावसाळ्यात वाऱ्यामुळे विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट होण्याची शक्यता वाढली होती. या परिसरात दररोज शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाशी थेट संबंध असलेला प्रश्न निर्माण झाला होता. ही गंभीर बाब हेरून सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी तात्काळ पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्या, अन्यथा अपघाताची जबाबदारी महावितरणवर राहील अशी ठाम भूमिका घेत महावितरणकडे तातडीने कारवाईची मागणी केली होती. संकाये यांनी स्पष्ट केले की, शाळेच्या डीपीभोवती वाढलेली झाडं व वेली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्यासारखी परिस्थिती निर्माण करत आहेत. त्यामुळे महावितरणने झपाट्याने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या मागणीची दखल महावितरण विभागाने लगेच घेतली असून, बातमी प्रसिद्ध होताच अवघ्या एका दिवसात डीपीवरील सर्व झाडं, वेली व झुडपे हटविण्यात आले. परिणामी, परिसर पुन्हा सुरक्षित झाला असून संभाव्य धोका टळला आहे. या जलद कारवाईमुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांच्या जागरूकतेला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण बाब ठरलेल्या या प्रकरणात लोकप्रतिनिधींनी आणि शासकीय यंत्रणांनी तत्परतेने प्रतिसाद दिल्यास समाजात जनतेचा विश्वास अधिक बळकट होतो, हे या घटनेतून सिद्ध झाले आहे.



# पावसाने दडी मारल्याने लावलेली सरकी जमिनीतच गेली कुजून दुबार लावण्याचे संकट

## पिके वाचवण्याकरता ठिंबक व तुषार सिंचनद्वारे पाणी देण्यास सुरूवात; शेतकऱ्यांच्या आभाळाकडे नजर

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील काही शेतकरी यांनी जुनच्या पहिल्याच आठवड्यात परिसरात पावसाने हजेरी लावल्याने या वर्षी खरीपाची पेरीनी मृग नक्षेत्रातच अगदी वेळेवर झाल्याने धारूर सह परीसरातील शेतकरी सुखावला होता मातीत पेरलेल्या बियांना कोमारे फुटत असतांना व काही पीके तग धरत असतांनाच पावसाने दडी मारल्याने पिके धोक्यात आले आहेत. तब्बल पंदराते दहा-दिवस झाले आहेत. पावसाने दडी मारल्याने धारूर परीसरातील शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावण्याची शक्यता असुन शेतकरी चिंतेत असल्याचे चित्र परिसरात दिसत आहे.



मागील आठ ते दहा दीवसापासुन आकाशात ढग येतात अन जातात पाऊस रोजच गुंगारादेत असल्याने मुग, तुर, कापुस, सोयबीन हे पिक संकंटात संपडली आहेत. या वर्षी चांगला पाऊस होनार असल्याच्या आंदाज हवान खात्याने वर्तवल्याने चांगला पाऊस होईल या आशेपोटी शेतकऱ्यांनी जुन महीन्याच्या पहील्याच आठवड्यात झालेल्या पावसावरच खरिपाच्या पेरन्या केल्या माञ पेरन्या झाल्यानंतर पावसाने धडी मारल्याने पिके संकटात सापडले आसुन शेतकऱ्याच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

ठिंबक व तुषारद्वारे पाणी देण्यास सुरूवात मागील आठ ते दहा दिवसापासून पावसाने दडी मारल्यामुळे खरिपाची पिके धोक्यात आली आहेत. पिके वाचवण्या करता उपलब्ध आसलेल्या पाण्याचा ठिंबक व तुषार सिंचनाचा वापर करून पिके वाचवण्या करता शेतकऱ्याची धडपड चालू झाली आहेत. बिगर सिंचना खालीली क्षेत्रावरील पिके टाकु लागले माना बिगर सिंचना क्षेत्राखाली जमीन खुप मोठ्या प्रमाणावरच आहे. पाऊस पडला तर पिके येतात. मात्र सध्या दहा दिवसापासून पावसाने दडी मारल्याने या क्षेत्रावरील पिके आता पावसाअभावी माना टाकु लागले आहेत.

उसन वारी करून खरेदी केले बि-बियाणे जुनच्या पहील्या आठवड्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे उसन वारी व सावकराकडुन पैसे घेऊन बि-बीयाणे खरेदी करून लागवड केली पंरतु पावसाने दडी मारल्याणे पिके धोक्यात आल्यामुळे उसन वारी व सावकराकडुन पैसे घेणारे शेतकरी चांगलेच हवालदील झाले आहेत. पावसाने दडी मारल्याने खरीपाचे पिके वाचवण्यासाठी ठिंबक व तुषार सिंचनाद्वारे पाणी देण्यास शेतकऱ्यानी सुरूवात केली आहे. तरी पण कापूस सरकी कोमेजून जमिनीत च जिरली आहे. काही आलेले कोंब सुकून गेले आहेत, असे यशवंत घोळवे या शेतकऱ्यांना संगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT